
अमली पदार्थांचे सेवन


GPS Map Camera
Kowad, Maharashtra, India
292g+f4p Kala Mahavidyalay, Kowad, Maharashtra 416508, India
Lat 16.001129° Long 74.375941°
31/07/2025 11:02 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Kowad, Maharashtra, India
292g+f4p Kala Mahavidyalay, Kowad, Maharashtra 416508, India
Lat 16.001132° Long 74.37592°
31/07/2025 10:47 AM GMT +05:30
Google

# तरुणांनो, अमली पदार्थांपासून दूर राहा, सेवन केल्यास गुन्हा

## पोलिस उपनिरीक्षक भिंगारदिवे : कला महाविद्यालयात अमली पदार्थ जनजागृती अभियान

**सकाळ वृत्तसेवा**

कोवाड, ता. १ : 'मित्रांच्या मदतीने अथवा सहज म्हणून अमली पदार्थांचे सेवन करतो. मग, हळूहळू त्याचे सवयीत रूपांतर होते. थोड्या दिवसांनी त्याच्या आहारी जातो. हेच व्यसन आपल्याला जखडून ठेवते आणि स्वतःला उद्ध्वस्त करते. अशा अमली पदार्थांच्या सेवनापासून तरुण पिढीने दूर राहिले पाहिजे. अमली पदार्थांचे सेवन करणे व त्याला साथ देणे कायद्याने गुन्हा आहे,' असे प्रतिपादन पोलिस उपनिरीक्षक आकाश भिंगारदिवे यांनी सांगितले.

येथील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात एन.एस.एस. विभाग व कोवाड पोलिसांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या अमली पदार्थ जनजागृती अभियानात पोलिस उपनिरीक्षक आकाश भिंगारदिवे बोलत होते. प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. आर. पाटील अध्यक्षस्थानी होते.

अमली पदार्थांच्या सेवनाकडे तरुण पिढीचे वाढते प्रमाण चिंताजनक असल्याचे सांगून पोलिस उपनिरीक्षक भिंगारदिवे म्हणाले, 'तरुणांनी सिगारेट, गांजा, मावा, कोकेन, एम.डी. ड्रग, दारू अशा व्यसनांपासून दूर राहावे.



कोवाड : येथील कला महाविद्यालयात अमली पदार्थ जनजागृती अभियानात बोलताना पोलिस उपनिरीक्षक आकाश भिंगारदिवे. शेजारी प्राचार्य व्ही. आर. पाटील, प्रा. दीपक पाटील, अनंतराव देसाई, प्रा. बी. एस. पाटील, प्रा. आर. टी. पाटील आदी.

मजा किंवा फॅशन म्हणून केलेले व्यसन स्वतःच्याच जीवावर उठते. पोलिसांच्या गुन्हेगारी रेकॉर्डवर अमली पदार्थांचे सेवन करणाऱ्या तरुणांचीच जास्त नोंद आहे. अमली पदार्थांचे सेवन करणे किंवा सेवन करण्यास प्रवृत्त करणे हा कायद्याने गुन्हा आहे. त्यासाठी दहा वर्षांची शिक्षा होऊ शकते. सोशल मीडियावर पोलिसांची नजर असून, त्याचा विधायक कार्यासाठी वापर करा; अन्यथा सायबर गुन्हा होऊ शकतो. आपल्या आई-वडिलांचे आदर्श डोळ्यासमोर ठेवा. पुस्तकांचे वाचन करा. आपल्याकडील कौशल्याला योग्य संधी उपलब्ध करून द्या. नकारात्मक विचार बाजूला करा व सकारात्मकतेने कार्यरत राहा.'

प्रा. दीपक पाटील यांनी परिसरातील वाढत्या गुन्हेगारीवर भाष्य करत समाजाला व्यसनांपासून मुक्त करण्यासाठी तरुणांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. प्राचार्य पाटील यांनी व्यसनांपासून दूर राहून समाजिक कार्यात सहभाग घ्यावा, असे मत व्यक्त केले. प्रा. बी. एस. पाटील, प्रा. अनंतराव देसाई, प्रा. आर. टी. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. के. पी. वाघमारे, प्रा. ए. के. कांबळे, प्रा. आप्पाजी ससेमारी, शंकर पुजारी, तुकाराम सुतार, रोहन सुतार उपस्थित होते. प्रा. सी. ए. कणसे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. संदीप पाटील यांनी आभार मानले.

---



# महाविद्यालयीन जीवनात व्यसनापासून दूर रहा

## पो.नि. आकाश भंगारदिवे : कोवाड महाविद्यालयात जनजागृती अभियान

**चंदगड/महान कार्य वृत्तसेवा**

कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय कोवाडच्या एन. एस. एस विभाग आणि कोवाड पोलीस स्टेशनच्या वतीने अमली पदार्थ जनजागृती अभियान महाविद्यालयामध्ये आयोजित केले होते. यावेळी पोलीस उपनिरीक्षक आकाश भिंगारदिवे म्हणाले, तरुणांनी कॉलेज जीवनामध्ये व्यसनापासून दूर राहावे. पोलिसांच्या गुन्हेगारी रेकॉर्डमध्ये आज तरुणांचा भरणा होत आहे. सिगरेट, मावा, गांजा, कोकेन, ड्रग्ज यासारख्या व्यसनाच्या आहारी तरुण जात आहे. अमली पदार्थाचे सेवन करणे आणि अमली पदार्थाचे सेवन करणाऱ्याना साथ देणे कायद्याने गुन्हा आहे .त्यासाठी दहा वर्षाची शिक्षा होऊ शकते. त्यामुळे आता सावध व्हा. तसेच सोशल मीडियावर पोलिसांची नजर असून विधायक कामासाठी त्याचा वापर करा अन्यथा सायबर गुन्हा होऊ शकतो आणि आपले करिअर वाया जाऊ शकते. गुरुजन आई-वडील यांचा आदर्श ठेवा आणि पुस्तकांचे वाचन करा असे आवाहन त्यांनी केले.



प्रास्ताविकात एन.एस.एस विभाग प्रमुख प्रा.दीपक पाटील यांनी परिसरामध्ये सुरू असलेल्या अवैध धंद्यांचा आढावा घेऊन यामध्ये युवकांचा सहभाग वाढल्या बाबत चिंता व्यक्त केली. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.व्ही. आर.पाटील म्हणाले महाविद्यालयीन तरुणांनी व्यसनाच्या आहारी न जाता वेगवेगळ्या क्रीडा स्पर्धांमध्ये भाग घ्यावा समाजसेवा, देशसेवा करण्याची खूप मोठी संधी विद्यार्थ्यांकडे आहे त्यासाठी सकारात्मक विचार करावेत. सर्वोदय शिक्षण संस्थेच्या माध्यमातून चांगला नागरिक आणि माणूस घडविण्याचा प्रयत्न केला जात आहे. यामध्ये विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे.

प्रा.बी. एस. पाटील, प्रा.आर .टी. पाटील यांनीही मनोगत व्यक्त केली. कार्यक्रमासाठी हेड कॉन्स्टेबल अनंतराव देसाई, प्रा. के.पी वाघमारे, प्रा. ए.के कांबळे, प्रा. आप्पाजी ससेमारी, शंकर पुजारी,तुकाराम सुतार, रोहन सुतारसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार प्रा.सी.ए.कणसे यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रा. संदीप पाटील यांनी केले.